**शासकीय पैशाची अफरातफर**

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक क्रमांक सीडीआर-११७२/२४१८/डी-एक,

सचिवालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ६ सप्टेंबर १९७२

## परिपत्रक

शासनाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, शासकीय पैशाच्या अफरातफरीच्या नव्याच्या प्रकरणांमध्ये अफरातफरीस जबाबदार असणाऱ्या व्यक्तींकडून अफरातफर करण्यात आलेली रक्कम वसूल करण्याबाबत कारवाई करण्यास बराच विलंब होतो. कदाचित न्यायालयामध्ये अफरातफरीचा आरोप सिद्ध होईपर्यंत किंवा शिस्तभंगाची कार्यवाही पूर्ण करेपर्यंत वसुली तहकूब केल्याने हा विलंब होत असावा. अशा प्रकारची तहकुबी आवश्यक आहे किंवा काय याबाबत शासनाने विचार केला आहे आणि शासन असे निदेशित करते की, अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये जर प्राथमिक चौकशीवरून असे सिद्ध होत असेल की, एका विशिष्ट व्यक्तीने पैशाची अफरातफर केली आहे तर प्रथम तिला पैसे परत करण्यास सांगण्यात यावे व तिच्याकडून वसुली करण्यात यावी. आवश्यक असेल तर व ती जर पैसे परत करण्यास तयार असेल तर तिच्या वेतनातून पैसे जमा करून वसूल करण्यात यावे. तथापि ती पैसे परत करण्यास तयार नसेल अशा परिस्थितीत वरील प्रकारची वसुली करता येणार नाही परंतु विभागीय कार्यवाही आणि/किंवा खटला भरण्याची नेहमीची पद्धती अवलंबिली जावी. अशा प्रकारची कार्यवाही शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

OFFICE OF THE COLLECTOR
RATNAGIRI
Date 26 NOV 1972
Branch

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

म. के. पुरी,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

(शा.म.मु.) एच ९१ (२,५००—११-७२)

[मागे पहा